**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २९७/२०२२ मधील निशाणी ४२ खालील आदेश.</u>**

१. वादी यांनी निशाणी ३६ व ३७ चे दिनांक २१/०६/२०२३ चे आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस झालेला विलंब माफ होवुन वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. निशाणी ३६ व ३७ वरील दिनांक २१/०६/२०२३ चे आदेशाप्रमाणे मयत वादी लक्ष्मी नलावडे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचे अर्ज मंजुर करण्यात आलेले आहेत. तसेच त्यातील अबेटमेंन्ट चा हुकुमही रद्द करण्यात आला आहे व उशीराची माफी देखील दिलेली आहे. पंरतु वादीतर्फे मुखत्यार सदर दाव्याचे काम पाहत आहेत. वादी मुखत्यार हा सदर वादीचा मुलगा आहे आणि कुटुंबाची सर्व जबाबदारी त्याच्यावर आहे. वादीचे मुखत्यारास कौंटुंबीक जबाबदारीमुळे मुदतीत सदर दाव्यात आवश्यक दुरुस्ती करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करुन निशाणी ३६ व ३७ चे दिनांक २१/०६/२०२३ चे आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस झालेला विलंब माफ होवुन वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला. प्रतिवादींच्या मते वादीने अर्जात दिलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. केवळ प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने सदर अर्ज दाखल केलेला आहे. वादी हा तत्परतेने काम चालवित नाही.

त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी यांच्यातर्फे करण्यात आली.

४. अर्ज वाचला, कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादी यांनी निशाणी ३६ व ३७ च्या आदेशाप्रमाणे वादी यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अर्जाने वादीने निशाणी ३६ व ३७ वरील आदेशाप्रमाणे विलंब माफ करुन वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी मागितलेली आहे. वादीने सदर अर्जासोबत वैभव नलवडे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी निशाणी ३६ व ३७ च्या आदेशाप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. वादीने जो विलंब केला आहे त्याबद्दल वादींच्यावर खर्च बसविणे संयुक्तीक होईल. विलंब माफ करुन वादींना वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ३००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. निशाणी ३६ व ३७ चे आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस झालेला विलंब माफ होवुन वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येते. खर्चाची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

कोरेगाव. **(ए. बी. पाटील)**

दि. ०८/०२/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.